# यावल महाविद्यालयात अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा

यावल ( प्रतिनिधी) येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागातर्फे 18 डिसेंबर रोजी अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव येथील उर्दू विभाग प्रमुख डॉ.ए.ए.शेख होते तर अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. एम .डी. खैरनार यांनी भूषविले .

डॉ. शेख यांनी अल्पसंख्याकांचे हक्क या विषयावर मार्गदर्शन केले की भारत हा सर्वधर्म समावेशक देश आहे. या देशातील नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म ,परंपरा यांचे संवर्धन करता यावे यासाठी राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग नेहमीच प्रयत्नशील असतो. प्रा. एम .डी . खैरनार यांनी अध्यक्षीय भाषणात राष्ट्रीय अल्पसंख्याकांचे विविध हक्क, अल्पसंख्याकांच्या विकासाच्या विविध शासकीय योजना यांची माहिती दिली. प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुधा खराटे यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा. ए पी .पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी विकास विभाग प्रमुख डॉ. एस .पी .कापडे ,डॉ.एच. जी. भंगाळे व प्रा. एस . आर. गायकवाड यांनी सहकार्य केले .कार्यक्रमास डॉ.आर.डी पवार ,कनिष्ठ विभागातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

